## महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com


जा.क्रं./ प्रेस नोट/323/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 12/09/2024

# 1)घरफोडी :–

**1)मुखेड :–** दिनांक 11.09.2024 रोजी 02.00 वा. ते 04.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी मौ. सावरगाव वाडी ता.मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे घराचे चॅनल गेटचे व दरवाजाचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून घरातील कपाट चावीने उघडुन त्यातील सोन्याचे दागीने व नगदी असा एकुण 1,41,500/– रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी माणिक नारायण मुंडे, वय 25 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. सावरगाव वाडी ता. मुखेड जि. नांदेड,** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 305/2024 कलम 305,331(4) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री फड, मो. नं. 9923057399** हे करीत आहेत.

**2)उमरी :–** दिनांक 09.09.2024 रोजी 07.30 वा. ते दिनांक 10.09.2024 रोजी 08.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे आडत दुकान मौ. धानोरा बु. ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादी यांचे श्रीराम कृषी सेवा केंद्र आडत दुकानाचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून शेती पिकाचे ऑल क्लीनर किंमती 20,000/–रूपयाचा माल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी धनंजय आनंदराव सलगरे, वय 30 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. धानोरा बु. ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 318/2024 कलम 305(अ),331(4) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2018, श्री वडजे, मो. नं. 9765770159** हे करीत आहेत.

# 2)चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 09.09.2024 रोजी 10.30 वा. ते 16.00 वा. चे दरम्यान, **मुलांचे हॉस्टेल नं. 01 स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठ नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा asus vivo book 15 कपंनीचा लॅपटॉप किंमती 20,000/– रूपयाचा रूममध्ये ठेवलेला रूमचे लॉक व कडी काढुन आत प्रवेश करून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी नारायण बाळासाहेब कापुरे, वय 23 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. मुलांचे हॉस्टेल नं. 01 स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठ नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 819/2024 कलम 331(3), 305(अ) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोहेकॉ/**1271, श्री सातारे, मो. नं. 9823024794** हे करीत आहेत.

# 3)अवैध गुटखा बाळगला :–

**देगलुर :–** दिनांक 11.09.2024 रोजी 19.30 वा. चे सुमारास, **देगलुर ते नांदेड रोडवर अमोदी नर्सरी समोर वन्नाळी, ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने स्वतःचे आर्थीक लाभासाठी बिना परवाना बेकायदेशिररित्या आरोग्यास अपायकारक असलेला सुगंधित पान मसाला गुटखा व सागर पानमसाला, राजनिवास गुटखा, प्रिमियम जाफरानी जर्दा तंबाखू किंमती 17,010/–रूपयाचा माल मोटार सायकल एमएच.–26/सीए.–9388 किंमती 60,000/– रूपयाची वर चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने वाहतुक करीत असताना आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2462, ज्ञानोबा रघुनाथराव केंद्रे, ने. पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 426/2024 कलम 123,274,275,223 भा.न्या.सं–2023 कायदा सह कलम 59 अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम 2006 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री मुंडे,** मो.नं. 7722001720 हे करीत आहेत.

# 4)प्राण्यांस क्रुरतेने वागणुक :–

**विमानतळ :–** दिनांक 10.09.2024 रोजी 23.30 वा. चे सुमारास, **शंकरराव चव्हाण चौक, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या सहा गोवंश जातीचे जनावरे किंमती 2,40,000/–रूपयाचे एक बोलेरो पिकअप क्रमांक एमएच–26/बीई–7045 किंमती 4,00,000/–रू मध्ये असा एकुण 6,40,000/–रू मुद्येमालासह जनावरे दाटीवाटीने क्रुरतेने वागणुक देवुन वाहतुक करीत असताना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2166 दारासिंग लच्छमाजी राठोड, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं. 371/2024 कायदा कलम 5(अ), 5(ब),9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण व प्राण्यांना क्रुरतेने वागणुक अधिनियम 1955 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/344, श्री राणे, मो.क्रं. 9970391886** हे करीत आहेत.

## 5)जुगार :–

**1)भोकर :–**दिनांक 11.09.2024 रोजी 15.00 वा. चे सुमारास, **बोरगाव रोडवर मुर्तजा अली यांचे शेतात पत्राचे शेडमध्ये भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या झन्ना मना नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 14,400/–रूपये व एक स्कुटी, पाच मोबाईल असा एकुण किंमती 1,04,400/–रूपयाचा मुद्देमाल व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1692, राजेश्वर विश्वाभंर गुंडेवार, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे भोकर** गुरनं 335/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/926, कळणे मो.नं. 9334634975** हे करीत आहेत.

**2)किनवट :–**दिनांक 11.09.2024 रोजी 00.20 वा. चे सुमारास, **घोटी फाटा शिवार पत्राचे शेडमध्ये किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 4220/– रूपयाचा मुद्देमाल व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/2589 ओंकार सुरेश पुरी, ने. पोस्टे किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे किनवट** गुरनं 273/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/772, पाटोदे मो.नं. 9834864404** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 11.09.2024 रोजी 16.40 वा. चे सुमारास, **जय महाराष्ट्र हॉटेल समोरील रोडवर, चंदासिंग कार्नर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या एक लोखंडी तलवार किंमती 200/– रूपयाचे आपले ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/741, प्रभाकर दत्ता मलदोडे ने. स्थागुशा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 821/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1238 श्री मुपडे, मो.क्रं. 9822441238** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :–

**कुंटूर :–** दिनांक 11.09.2024 रोजी 11.45 वा. चे सुमारास, **मौ. सुजलेगाव ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3360/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1871 विवेक विठ्ठलराव इश्वरे, ने. पोस्टे कुंटूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 177/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1198 ,कंधारे मो.नं.7798794920** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड